# बकऱ्या चोरी करणारी कुख्यात टोळी देवळी पोलीसांच्या जाळ्यात

मागील काही महिन्यांपासुन पोलीस स्टेशन देवळी हद्दीतील गावामध्ये बकऱ्या चोरीचे सत्र सुरु होते. त्या दरम्यान फिर्यादी अयुब अली अहमद अली यांनी पो.स्टे. देवळी येथे रिपोर्ट दिला कि, दि. ०५-०४-२०२१ रोजी मध्यरात्री दरम्यान रत्नापुर शिवारातील त्यांचे शेड मधुन लहान मोठ्या अशा एकुण १३ बकऱ्या कि. १,५०,०००/- रु. किमतीच्या कोणतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्या. अशा रिपोर्टवरुन पो.स्टे. देवळी येथे अप.क्र. २५६/२०२१ कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचे तपासातदरम्यान मुखबीरकडुन मिळालेल्या गोपनीय माहीतीचे आधारे आरोपी नामे १) श्रावण हरिदास फुलमाळी, २) पवन सुभाष ननवरे, ३) रोशन मोतीराम क्षिरसागर, ४) मनोज लक्ष्मण राजपुत सर्व रा. पाटीपुरा, यवतमाळ यांना ताब्यात घेवुन सदर गुन्ह्याबाबत विचारपुस केली असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली तसेच सदर गुन्ह्यामध्ये टाटा व सफारी वाहनांचा वापर करुन वेगवेगळ्या ठिकाणी बकऱ्या चोरल्याची माहीती दिली. त्यावरुन त्यांचे ताब्यातुन टाटा व सफारी वाहन एकुण कि. १५,००,०००/- रु. व आरोपीतांनी बकऱ्या विकुन मिळविलेली रक्कमपैकी नगदी ३०,६००/- रु. असा एकुण कि. १५,३०,६००/- रु. चा मुद्देमाल हस्तगत करण्यात करुन गुन्हा उघडकिस आणला आहे.

सदर गुन्ह्याचे तपासादरम्यान यातील आरोपीतांना पो.स्टे. देवळी अभिलेखावरील गुन्हांबाबत विचारपुस केली असता त्यांनी मौजा काजळसरा, वायगाव (नि.), इसापुर या परीसरातुन बकऱ्या चोरुन नेल्या असल्याची माहीती दिल्याने पो.स्टे. देवळी १) अप.क्र. ४२४/२०२१ कलम 379 भादंवि., २) ४८३/२०२१ कलम ३७९ भादंवि., ३) ४६५/२०२१ कलम ३७९ भादंवि. प्रमाणे बकऱ्या चोरीचे दाखल असलेले गुन्हे सुध्दा उघडकिस आणले आहे.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक, वर्धा श्री. प्रशांत होळकर, मा. अपर पोलीस अधीक्षक, वर्धा श्री. यशवंत सोळंके, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, पुलगाव श्री. गोकुळसिंग पाटील यांचे मार्गदर्शनात स.पो.नि. तिरुपती राणे पो.स्टे. देवळी यांचे निर्देशाप्रमाणे पोलीस अंमलदार, कुणाल हिवसे, अनिल तिवारी, गजानन महाकाळकर, उमेश गेडाम, दयाल धवने, योगेश वानखेडे यांनी केली.